|।सुविचार।।

आयुष्यात कधीही कोणासमोर
स्वतःच स्पष्टीकरण देत बसू नका,
कारण ज्यांना तुम्ही आवडता,
त्यांना स्पष्टीकरणाची अजिबात गरज नसते.
अन ज्यांना तुम्ही आवडत नाही,
ते तुमच्या स्पष्टीकरणावर कधीच विश्वास
ठेवायला तयार होत नाही.

दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३२८
पाने : ०६, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.०९ जुलै २०२५

# राज्यात लवकरच निवडणुकांचे धुमशान !

## निवडणूक आयोगाने बोलावली जिल्हाधिकाऱ्यांची बैठक, कार्यकर्ते लागले कामाला

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, मुंबई :** राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे धुमशान होत आहे. गेल्या पाच वर्षांपासून स्थानिक पुढाऱ्यांना वनवास होता. अनेक पालिकांवर प्रशासन राज आले होते. त्यांचा वनवास आता संपेल. कार्यकर्त्यांना जल्लोष करता येणार आहे. आरे आवाज कुणाचा हा नारा पुन्हा घुमणार आहे. राजकीय पक्षांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी कवायत सुरू केली असतानाच आता राज्य निवडणूक आयोगाने सुद्धा तयारी सुरू केली आहे.



**जिल्हाधिकाऱ्यांची लवकरच बैठक**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राजकीय पक्षांची लगबग सुरू झाली आहे. म राठीच्या मुद्दा तापवून मुंबई, ठाणे महापालिकेसह इतर पालिकेच्या निवडणुकीची गोळाबेरीज सुरू झाली आहे. तर दुसरीकडे मिनी मंत्रालयाच्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीचे वारू सुद्धा उधळणार आहे. त्यामुळे या वर्षाच्या अखेरीस अथवा पुढील वर्षाच्या सुरुवातीला राज्यात विविध निवडणुकांचे धुमशान पाहायला मिळले.

राज्य निवडणूक आयोगाने त्यासाठी पावलं टाकली आहेत. आयोगाने राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांची बैठक बोलावली आहे. त्या बैठकीसाठीचे पत्र जिल्हाधिकाऱ्यांना पाठवण्यात आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तयारीसाठी ही बैठक बोलावण्यात आल्याचे समजते. १० जुलै रोजी ही बैठक होईल. व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे राज्यातील सर्व जिल्हाधिकारी त्याला उपस्थित असतील. गुरुवारी दुपारी १२ वाजता ही बैठक होईल. त्याविषयीचे परिपत्रक निवडणूक आयोगाने काढले आहे. राज्य निवडणूक आयोगाचे उपायुक्त राजेंद्र पाटील यांनी बैठकीबाबतचे पत्र राज्यातील सर्व विभागीय आयुक्तांना पाठवले आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्थांचा बिगूल वाजला...**

येत्या काही काळात राज्यातील ३२ जिल्हा परिषदा, ३३६ पंचायत समित्या, २४८ नगरपरिषदा, ४२ नगरपंचायती आणि २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका होतील. त्याची प्रशासकीय स्तरावर जय्यत तयारी सुरू आहे. या निवडणुकीच्या पूर्वतयारीचा विभागनिहाय आढावा १० जुलै रोजी घेण्यात येणार आहे. पण या बैठकीत महानगरपालिकेच्या निवडणुकीचा आढावा नसेल. राज्य निवडणूक आयुक्त व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आढावा घेतील. त्याविषयीचे परिपत्रक निवडणूक आयोगाने काढले आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात राज्यात निवडणुकांचा धडाका सुरू होईल, असे चित्र आहे.

## राज्यातील अंगणवाडी सेविकांना मिळणार पेन्शन आणि ग्रॅज्युइटी

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०८, मुंबई :** राज्यातील अंगणवाडी सेविका गेल्या कित्तेक पासून तुटपुंजा मानधनावर काम आणि किमान वेतनपेक्षा ही कमी पगारावर करीत आहेत.या मुळे त्यांना अनेक आर्थिक आणि कौटुंबिक समश्याना तोंड द्यावे लागते.

अशातच आता या अंगणवाडी सेविकांचे मे महिन्याचे मानधन देखील त्यांच्या खात्यावर जमा न झाल्याचे समोर आले आहे.

आपल्याला आजवरच्या काही प्रमुख प्रलंबित म ागण्यांसाठी त्यांचे मुंबईतील आझाद मौदानातं आंदोलन सुरु आहे.

त्यांच्या याच आंदोनाची दखल घेऊन राज्य सरकार मोठी खूशखबर देण्याच्या तयारीत आहे.राज्य सरकारच्या निर्णयानुसार राज्यातील अंगणवाडी सेविकांना लवकरच पेन्शन लागू होणार असुन त्याचसोबत ग्रॅज्युएटीही दिली जाणार असल्याचे समजत आहे. हा निर्णय झाला तर राज्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना १ लाख ५५ हजारापासून ते १ लाख ७६ हजारापर्यंत ग्रॅज्युटी मिळण्याची शक्यता आहे. राज्यातील दोन लाख अंगणवाडी सेविकांना आणि मदतनिसांना याचा लाभ मिळणार आहे.




राज्यातील अंगणवाडी सेविकांना ग्रॅच्युईटी किती द्यायची यावर निर्णय झाला असून, त्यांना पेन्शन किती द्यायची यावरती विभागाची सल्लामसलत सुरू असल्याची माहिती आहे. येत्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये महिला आणि बालविकास विभागाचा प्रस्ताव येण्याची दाट शक्यता आहे.

राज्यात सध्या २ लाख अंगणवाडी सेविका आणि म दतनीस आहेत. त्यापैकी १ लाख १० हजार अंगणवाडी सेविका आणि ९० हजार मदतनीस यांना पेन्शन योजना आणि ग्रॅज्युटीचा लाभ मिळणार आहे.

अंगणवाडी सेविकांच्या नेमक्या मागण्या तरी काय आहेत...?

सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार शासकीय कर्मचारी घोषित करा.

वेतनश्रेणी, ग्रॅच्युईटी, भविष्य निर्वाह निधीसह इतर लाभ द्यावेत.

दरमहा २६ हजार रुपये मानधन देण्यात यावे.

मदतनिसांना २० हजार रुपये मानधन द्या.

महागाई दुपटीने वाढते, म्हणून, दर सहा महिन्यांनी मानधनात वाढ करावी.

सेवा समाप्तीनंतरच्या पेन्शनचा प्रस्ताव अधिवेशनात मंजूर करा.

अंगणवाड्यासाठी मनपा हद्दीत ५ हजार ते ८ हजार भाडे मंजूर करावे.

आहाराचा दर बालकांसाठी १६ तर अतिकुपोषित बालकांसाठी २४ रुपये करावा.

दरम्यान आपल्या विविध मागण्या राज्य सरकारने मान्य कराव्यात यासाठी अनेक दिवसांपासून आंदोलन सुरू केलं होतं. त्यानंतर आता राज्य सरकार त्यासंबंधित निर्णय घ्यायच्या तयारीत आहे. अंगणवाडी सेविकांना आणि मदतनिसांना देण्याची ग्रॅच्युईटीची रक्कम जवळपास निश्चित झाली आहे, पण पेन्शन किती द्यायचाी याबाबतचा निर्णय मात्र अद्याप झाला नसून त्यावर सल्लामसलत सुरू आहे.

राज्यात महाविकास आघाडीचं सरकार असताना, उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना राज्यातील अंगणवाडी सेविकांनी त्यांच्या पेन्शन, ग्रॅच्युईटी आणि इतर म ागण्यांसाठी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन सुरू केलं होतं. त्यानंतर आताचे महायुतीचे सरकार त्यावर निर्णय घेण्याच्या अंतिम टप्प्यात असून येत्या कॅबिनेटम ध्ये त्यावर शिक्कामोर्तब होणार असल्याची खात्रीशीर माहिती आहे.

## नगर-पुणे प्रवास होणार दीड तासात !

## अहिल्यानगर महामार्गालगत नवा रेल्वे मार्ग...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, अहिल्यानगर :** बहुप्रतीक्षित पुणे-अहिल्यानगर नवीन रेल्वे मार्ग लवकरच प्रत्यक्षात उतरणार आहे. याबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल रेल्वे बोर्डाकडे देण्यात आला असून हा नवीन रेल्वे मार्ग पुणे-अहिल्यानगर महामार्गाच्या बाजूनेच असेल अशी माहिती समजली आहे. नवा मार्ग झाल्यास आताच्या तुलनेत ३८ किलोमीटर अंतर वाचेल. नवीन रेल्वे मार्गामुळे दीड ते पावणेदोन तासांतच पुण्याहून अहिल्यानगरला येते येणार आहे. रांजणगाव, सुपा येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची (एम आयडीसी) केंद्रे असल्याने औद्योगिक विकासाला चालना मिळेल असे म्हटले आहे.

नव्या मार्गासाठी सुमारे११ हजार कोटी रुपये खर्च येण्याचा अंदाज आहे. सध्याच्या रेल्वे मार्गाचे अंतर सुमारे १५४ किलोमीटर आहे. नवीन रेल्वे मार्गाबाबत गेल्या अनेक दिवसांपासून प्रवाशांची मागणी होती. त्यादृष्टीने मध्य रेल्वेच्या बांधकाम विभागाने सर्वे क्षण करून काही दिवसांपूव डीपीआरफ सादर केला. यात हा मार्ग होणे प्रवासी आणि रेल्वेच्याही दृष्टिकोनातून फायदेशीर असल्याचे नमूद केले आहे.

**असा असेल मार्ग...**

पुणे-वाघोली-शिक्रापूर-रांजणगाव-शिरूर-कारेगाव-सुपा-चास-केडगाव-अहिल्यानगर असा हा मार्ग असेल. रेल्वेमार्गाची ११६ किमी लांबी असून १२ स्थानके असतील.

## २६ जनावरांची अवैध वाहतूक करणार ट्रक कुंडलवाडी पोलिसांनी पकडले

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०७, कुंडलवाडी :** २६ जनावरांची निर्दयीरीत्या व क्रुरपणे अवैध वाहतूक करणारा ट्रक कुंडलवाडी पोलिसांनी शेळगाव (थडी) येथे दि.७ जुलै रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास पकडले असून याप्रकरणी दोन आरोपींना अटक केली असून एक जण फरार आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांनी दिली आहे.

मध्यप्रदेशातील ग्वाल्हेर येथून निजामाबाद कडे २६ जनावरांची निर्दयीरीत्या व क्रुरपणे अवैध वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती कुंडलवाडी पोलिसांना मिळाल्यावरून दि.७ जुलै रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास कुंडलवाडी ते धर्माबाद रोडवर शेळगाव (थडी) गावाजवळ ट्रक क्रमांक एम पी ०७ एच बी ७६८० यास अडवून चौकशी केली असता ट्रकम ध्ये २६ जनावरे अत्यंत क्रूरपणे व निर्दयीपणे भरून वाहतूक करीत असल्याचे आढळून आले. कुंडलवाडी पोलिसांनी ट्रक थांबवताच ट्रक मधील एक जण फरार झाला असून दोन आरोपींना कुंडलवाडी पोलिसांनी अटक केली असून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांनी दिली आहे. ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र मांजरमकर, पोहेकाँ नागेंद्र कांबळे, फैय्याज बेग, अमर शिंदे, शिवा गंगुलवार गौस शेख, जाधव, सुनील चिगळे आदींनी केली आहे. घटनास्थळी धर्माबाद उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत संपत्ते यांनी भेट दिली.

## थोडक्यात

### हॉटेल व्यवसायात केलेली दरवाढ अन्यायकारक!

**नवी मुंबई हॉटेल ओनर्स असोसिएशनचा आंदोलनाचा इशारा**




**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.०७, नेरूळ (नवी मुंबई) :** राज्यातील हॉटेल आणि परमिट बार व्यावसायिकांसाठी एकच करप्रणाली असावी, सरकारने करप्रणालीत केलेली अन्यायकारक दरवाढ म ागे घ्यावी, अन्यथा सर्व हॉटेल मालक, परमिट रूम मालक, व मद्यग्राहक रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने आंदोलन करतील, असा इशारा नवी मुंबई हॉटेल ओनर्स असोसिएशनच्या बैठकीत सोमवारी नेरुळ येथे बोलताना अध्यक्ष दयानंद शेट्टी यांनी दिला.

यावेळी बोलताना अध्यक्ष दयानंद शेट्टी यांनी सांगितले की, राज्य उत्पादन शुल्क विभाग यांनी महसूल वाढीसाठी किरकोळ विक्री व्यवसायावर अन्यायकारक धोरण राबविले आहे. सरकारच्या या धोरणाला बैठकीत विरोध करण्यात आला. यावेळी प्रसार माध्यमांसमोर नवी मुंबई हॉटेल ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष दयानंद शेट्टी, उपाध्यक्ष जयप्रकाश शेट्टी, सरचिटणीस महेश शेट्टी, खजिनदार मोहन गौडा आदि मान्यवर उपस्थित होते.

राज्यातील मद्य उद्योग आर्थिक संकटात आहे. हॉटेल व्यवसायाला उद्योगाचा दर्जा आहे मात्र, हॉटेल उद्योगाला कोणतीही सवलत किंवा व्यवसाय सुलभतेत कोणतीही मदत दिली जात नाही. सर्व प्रकारच्या आर्थिक आव्हानांना तोंड देत हा उद्योग आजही तग धरून आहे.

राज्यातील हॉटेल असोसिएशन किंवा मद्य उद्योगातील कोणत्याही घटकास विश्वासात न घेता करप्रणालीत वाढ करण्यात आली असून त्याचा थेट परिणाम ग्राहक आणि हॉटेल व्यावसायिकांवर होत असल्याचे उपाध्यक्ष जयप्रकाश शेट्टी, सरचिटणीस महेश शेट्टी यांनी सांगितले.

यावेळी वार्षिक उत्पादन शुल्काचा सर्वाधिक परिणाम सर्व परमिट रूम धारकांवर असल्याने मूल्यवर्धित कर (व्हॅट) तात्काळ रद्द करावा, सर्वसाधारण जनगणनेनुसार वार्षिक उत्पादन शुल्क नूतनीकरण शुल्क समायोजित करावे, विक्रीच्या पहिल्या टप्प्यावर उत्पादन शुल्क किमान वाढीसह हॉटेल उद्योगाच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी संबंधित हॉटेलचालक आणि परमिट रूम धारक संघटनांकडून सूचना आणि मार्गदर्शन घेण्यात यावे, ग्राहकांना दारू देण्यासाठी हॉटेलचे सीमांकन आणि हॉटेलमध्ये दारू पिण्यासाठी परमिट देणे या नियम आणि अटी शिथिल कराव्यात असा ठराव सदर बैठकीत संमत करण्यात आला. सरकारच्या अन्यायकारक धोरणा विरोधात राज्यभरातून हॉटेल व्यावसायिक विरोध प्रदर्शन करीत आहेत. येत्या काळात सरकारने विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन लवकरात लवकर तोडगा काढावा, अन्यथा अधिक तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा गंभीर इशारा यावेळेस देण्यात आला.

यावेळी नवी मुंबई हॉटेल ओनर्स असोसिएशनचे माजी अध्यक्ष रविंद्र शेट्टी, झोनल उपाध्यक्ष डॉ. शिवा मुडीगेरे (वाशी), माजी अध्यक्ष शाम एन. शेट्टी आदींसह नवी मुंबई, पनवेल मधील हॉटेल आणि बार मालक उपस्थितीत होते.

### सौर ऊर्जा वापरणाऱ्या नागरिकांवर अन्याय होऊ नये... ऊर्जा विभागाने स्पष्ट भूमिका घ्यावी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०८, चंद्रपूर :** ऊर्जा विभागाने सौर ऊर्जा प्रणाली बसविल्यानंतर २४ तास नेट मीटरिंगची सुविधा उपलब्ध होईल, अशी अपेक्षा नागरिकांनी केली होती. मात्र आता सरकार केवळ दिवसा निर्माण होणाऱ्या विजेसाठीच नेट मीटरिंग मर्यादित करण्याचा विचार करत आहे. रात्रीच्या वेळेस ही सुविधा लागू न करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यामुळे सौर प्रणाली बसवलेल्या नागरिकांचा अपेक्षा भंग होऊन त्यांची प्रत्यक्षात फसवणूक होईल, असे चित्र निर्माण झाले आहे. त्यामुळे ऊर्जा विभागाने यासंदर्भातील अस्पष्टता तात्काळ दूर करावी आणि आपली स्पष्ट भूमिका या सभागृहात मांडावी, अशी ठाम मागणी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सोमवारी (दि.७ जुलै) विधानसभेत पुरवणी मागण्यांवरील चर्चेदरम्यान केली. ते पुढे म्हणाले, एजी पंपाच्या संदर्भात अर्धा तास सविस्तर चर्चा करण्यात आली. महाराष्ट्रातील अनेक शेतकऱ्यांकडून याबाबत दूरध्वनीद्वारे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. ज्यांनी एजी पंपासाठी डिमांड भरली आहे, अशा सर्व शेतकऱ्यांना तात्काळ एजी पंप देण्यात यावेत, यासाठी संबंधित विभागाने तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

**चंद्रपूरच्या पॉवर प्रोजेक्टला गती द्या : आ. सुधीर मुनगंटीवार**

चंद्रपूरमध्ये ८०० मेगावॅट क्षमतेच्या नवीन वीज संच सुरू करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने करण्यात येत आहे, मात्र या प्रकल्पाच्या अंम लबजावणीत अपेक्षित गती दिसून येत नाही. हा प्रकल्प चंद्रपूर जिल्ह्याच्या ऊर्जा निर्मितीतील महत्त्वाचा टप्पा ठरेल. त्यामुळे ऊर्जामंत्री व ऊर्जा राज्यमंत्र्यांना विनंती आहे की, चंद्रपूरच्या ८०० मेगावॅट वीज प्रकल्पाला तातडीने वेग देण्यासाठी आवश्यक ती ठोस पावले उचलावीत. अशी मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केली.

## संपादकीय

### कलात्मक दिग्दर्शक : गुरुदत्त

अगदी थोड्या काळात ज्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटून हिंदी चित्रपट सृष्टीत आपले नाव अजरामर केले त्या हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते गुरुदत्त यांची आज जयंती. आज त्यांची १०० वी जयंती. गुरुदत्तजींच्या १०० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देणारा हा विशेष लेख.

गुरुदत्त हिंदी चित्रपट सृष्टीत जिवंतपणीच अख्यायिका बनलेले व्यक्तिमत्व. आजही गुरुदत्त यांचे नाव घेतले की आठवतात ते त्यांचे कलात्मक चित्रपट मग ते चौदहवी का चांद असोत की कागज के फूल, सी आय डी असोत की मी. अँड मिसेस ५५ आरपार असोत की प्यासा. त्यांच्या प्रत्येक चित्रपटात आणि चित्रपटातील प्रत्येक दृश्यात कलात्मकता दिसून येते. चित्रपट कलात्मक असूनही त्यांच्या चित्रपटांना प्रेक्षकांची पहिली पसंती मिळत असे म्हणूनच त्यांना कलात्मकता आणि व्यावसायिकता यांच्यात सुवर्णमध्य साधणारा संवेदनशील निर्माता दिग्दर्शक म्हंटले जाते. वर उल्लेख केलेले सर्व चित्रपट हिंदी चित्रपट सृष्टीतील माईल स्टोन चित्रपट आहेत. आजही फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट मध्ये शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना हे चित्रपट आवर्जून दाखवले जातात. त्यांच्या प्रत्येक चित्रपटाला समीक्षकांची तर पसंती मिळालीच पण प्रेक्षकांनी ही चित्रपट डोक्यावर घेतले. साहिब बिबी और गुलाम या चित्रपटाला तर राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. आजही ती तितकीच लोकप्रिय आहेत मग ती बाजी चित्रपटातील आज की रात पिया दिल ना तोडो... जाल मधील ये रात ये चांदणी फिर कहा.... आरपार मधील बाबूजी धीरे चलना..... सी आय डी मधील तर सर्वच गाणी लोकप्रिय झालीत मग ती आँखो ही आँखो मे इशारा हो गया... लेके पहला पहला प्यार... ये दिल है मुश्कील जिना यहा... मी अँड मिसेस ५५ मधील थंडी हवाये काली घटाये.... प्यासा मधील जाने वो कैसे लोग थे... कागज के फूल मधील वक्त ने किया क्या हसी सितम... चौदहवी का चांद मधील चौदहवी का चांद हो या आफताब हो.. साहिब बिबी और गुलाम मधील ना जाओ सय्या छुडाके बैया..... त्यांच्या चित्रपटातील सर्व गाणी सुमधुर होती म्हणूनच ती गाणी लोकप्रिय ठरली. केवळ गाणीच नाही तर त्यांच्या चित्रपटातील संवादही लोकप्रिय झाले. गुरुदत्त यांच्यावर बंगाली साहित्य आणि विचारांचा मोठा प्रभाव होता हाच प्रभाव त्यांच्या चित्रपटातूनही दिसून येतो.

९ जुलै १९२५ रोजी बंगलोर येथे त्यांचा जन्म झाला त्यांचे खरे नाव वसंत शिवकुमार पदुकोण असे होते. जन्म जरी बंगलोर येथे झाला तरी त्यांचे बालपण पश्चिम बंगालमधील भवानीपूर येथे गेले. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांनी मॅट्रिक पर्यंतच शिक्षण घेतले. नंतर ते पुण्यात आले. तिथे प्रसिद्ध फिल्म कंपनी प्रभात मध्ये त्यांना असिस्टंट दिग्दर्शक व नृत्य दिग्दर्शक म्हणून नोकरी मिळाली. तिथेच त्यांची ओळख देव आनंद यांच्यासोबत झाली ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले आणि पुढे ही मैत्री इतकी घट्ट झाली की दोघांनीही एकमेकांना आपल्या चित्रपटात संधी दिली. देव आनंद यांच्या बाजी आणि जाल या चित्रपटाचे दिग्दर्शन गुरुदत्त यांनी केले तर गुरुदत्त यांनी निर्माण केलेल्या सी आय डी या चित्रपटात देव आनंद हे नायक होते .

गुरुदत्त हे एक महान चित्रपट कर्मी होते त्यासोबतच ते एक माणूस ही होते. इतर माणसांप्रमाणे त्यांच्यातही गुणदोष होते. बाजी या चित्रपटाच्या सेटवर गुरुदत्त यांची गीता रॉय या बंगाली अभिनेत्रीशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. त्यांना तीन मुलेही झाली पण दोघांचे एकमेकांशी पटले नाही दोघात किरकोळ कारणांमुळे वाद होऊ लागला. दररोज होणारा वाद टाळण्यासाठी गीता रॉय मुलांना घेऊन घराबाहेर पडल्या, वेगळ्या राहू लागल्या याच दरम्यान गुरुदत्त हे वहिदा रहेमान यांच्या जवळ गेल्याचे बोलले गेले मात्र वहिदाजींना आपले करियर करायचे असल्याने त्या या नात्यात अडकल्या नाहीत. या सर्व कारणांनी गुरुदत्त कमालीच्या डिप्रेशनमध्ये गेले आणि तो काळा दिवस उजाडला. ९ ऑक्टोबर १९६४ रोजी पत्नी गीता रॉय मुलांसह त्यांना भेटायला येणार होत्या मात्र त्या आल्या नाहीत त्यामुळे चिडलेल्या गुरुदत्त यांनी रागाचा भरात झोपेच्या गोळ्या खाल्लया. त्यांना हॉस्पिटलमध्ये ऍडमिट करण्यात आले पण दुसऱ्याच दिवशी म्हणजे १० ऑक्टोबर १९६४ रोजी त्यांची प्राणज्योत माळवली.

अवघ्या ३९ वर्षाचे आयुष्य त्यांना लाभले. त्यांच्या निधनानंतर प्रख्यात शायर कैफी आझमी यांनी लिहिलंय

**रहनेको सदा दहरमे आता नही कोई**
**तुम जैसे गये वैसे जाता नहीं कोई**
**एक बार तो मौत भी घबरा गई होगी**
**यू मौत को सिने से लगाता नहीं कोई**

# संजीवांच्या पृथ्वीवरील जिवंत माणूस

कार्यक्रम पत्रिकेवरील स्थळावर मी अगदी सकाळी नऊ वाजता पोहचले. कार्यक्रमाला वेळ असल्यामुळे तेथिल परिसर अनुभवण्याची सुवर्णसंधी मला मिळाली. निसर्गरम्य वातावरणात सुंदर सुसज्य आणि रुबाबदारपणे उभी असलेले राजे संभाजी गुरुकुल शाळेची इमारत. मंद वाहणाऱ्या वा-यासह पक्षांची किलबिलाट तेथिल वातावरणात रंगत आणून उत्साह वाढत होती. ती कायम स्मरणात रहावी अशी सुवर्ण सकाळ....!! तिथे जाऊन मी एका व्यक्तीला नमस्कार केला. त्यांनी सुद्धा अतिशय नम्रपणे नमस्कारातून प्रतिसाद दिला. सकाळी सकाळी पाय जमीनीवर हात कामात भिजलेला 'माणुसपनाचा तिलक' लावलेली व्यक्ती माझ्या समोर उभी होती. मी किती महान कार्य करतो हे सांगण्यास स्वतःहुन जरी कुणी पुढे येत नसले तरी एक दिवस जाईल तेंव्हा तो इतिहास होतो आणि जेंव्हा इतिहास समोर येईल तेंव्हा त्याला घडवण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या व्यक्तींची नावे समोर येते. पाटिल सरांच्या बाबतीत सुद्धा हेच तेथिल अनेक उदाहरणावरून प्रत्यक्ष उघड्या डोळ्यांनी सर्वांनाच स्पष्ट दिसत हो .

विषय थोडा वेगळा आहे एखादया व्यक्ती विषयी १०-१५ मिनाटाच्या संभाषणातून त्याची व्यक्ती रेखा लिहन जरा धाडसाच काम होईल, कदाचित मला तेवढ सुटसुटीत मांडता येणं शक्य नाही परंतू आज एका व्यक्ती विषयी मांडण्याचा मोह अनावर होतोय, त्यांना शब्दात बांधने म्हणजेच कडा ओलांडलेल्य नदीला बांध घालण्याचा निरर्थक प्रयत्न होईल. दिवसभर कार्यक्रमाचा शिण प्रवासाचा थकवा ही आज जाणवेणासा झाला कारण मला लिहायच काहितरी आज अनुभवलेले क्षण खरच मी खुप भाग्यवानआहे. कारण आज आयोजकांनी ऐन वेळेवर कार्यक्रमाची जागा बदलून गुरुकुल मध्ये घेण्याच ठरवल त्यामुळे मला सजीवांच्या पृथ्वीवर जीवंत माणसाला भेटण्याचा दुर्मिळ योग्य प्राप्त झाला. कवी सम्मेलनाची सर्व जबाबदारी खांद्यावर घेऊन व्यवस्थित पार पाडणे अगदी बैठक व्यवस्थेपासून ते जेवन आणि निरोप घेण्या पर्यंत सर्व काही चोख कामगीरी त्यांनी बजावली.

कार्यक्रम संपल्यावर निघण्याच्या वेळेला मी संराना भेटले तेंव्हा १०-१५ मिनिटे आमच बोलन झालं. ते बोलत होते तेंव्हा अस वाटल की, त्यांचा प्रत्येक शब्द न् शब्द लिहून घ्यावा. ही व्यक्ती कुणी साधी सुधी व्यक्ती तर मुळीच नाही हा माझा अनंदाज मला सत्यात अनुभवायला मिळाला. कमालीचा साधेपणा तो येण्यासाठी संघर्षाचे किती जुल्मि विष पिले असेल, कारण स्थिरत्व दिसत तितक्या सहज कृतीत उतरविणे एवढ सोप नाही, त्यासाठी अनुभवाने मिळविलेल्या ज्ञानाला कसोटीने लावलेली शिस्त नजरेस चटकन भरण्या सारखी होती, अगदी त्या सोनचाफ्या सारखी म्हणजे अन्य फुलाप्रमाणे त्याला फारसा विशिष्ट आकार आकर्षक रंग नसतो असतो तो अत्यंत मोहक सुंगध ! म्हणजे याच रुप स्थूल दृश्य नसुन अंतरंगिचा सुगंध असतं. बाकी फुले दुर अंतरावर असली तरी त्याचा वास येत नाही आणि चाफा लपविला तरी त्याचा सुंगध लपवता येत नाही अगदी सुकल्या नंतरही तो कायम तेवढाच दर्वळत राहतो, अगदी हुबेहूब तसच सरांच व्यक्तीमत्व आहे.

अनिल पाटिल सर एक शिक्षकच नसुन ते एक दर्जेदार लेखक, उत्कृष्ठ संचालक, निरभिड वक्ता आहे. त्यांची दोन पुस्तके प्रकाशित असुन तिसरे लिहुन पूर्ण आहे.

हस्तांदोलन करत संराचा निरोप घेतला तेंव्हा ...!! त्या हाताने त्यांच्या डोळ्यात दडलेल्या प्रश्नांकित रहस्य कदाचित मला थोडस समजल असाव अस माला वाटल. त्यांच्या बद्दल लिहण्यास मी मुळीच सक्षम नाही आणि तेवढी माझी बुद्धी प्रगल्भ नाही. माझा अविकसित मेंदू त्यांची व्यक्तीरेखा जशीच्यातशी साकारण्यास सक्षम नाही याची मला पूर्ण खात्री आहे. परंतू संघर्षाच्या प्रहारात राबलेले हात आणि दाखविण्यासाठी चेहर्यावरची हस्यलकरीचा प्रघात यांचा मेळ बसवणं म्हणजे विलक्षण विद्वत्तेची विचारासोबत घातलेली दुर्मिळ सांगड होय. कितीतरी वेदना सहन करुन या स्थित स्थैर्यापर्यंत व्यक्ती पोहचतो ते एवढया सहजा सहजी शक्यच नाही. इतका साधेपणा की, प्रत्येकाला आपला माणूस वाटावा. जो त्यांच्या सानिध्यात येईल त्याने तो क्षण भरभरून जगावा, इतकी प्रामाणिक आपुलकी त्यांच्या वर्तणुकित आहे. अनगिनत नियतिच्या खेळामध्ये वांरवार होणारे प्रहार सहन करून ही अवस्था प्राप्त होते जी त्याने जन्माने मिळवलेली नव्हे तर, स्व- मल्यांची शिस्तबद्ध संवर्धन करत प्रत्यक्षात उतरविलेला दर्शनिय स्वभाव असतो. अगदी एखाद्या सर्कशीतल्या विदुषका सारखे खोलवर अंतकरणात चिघळलेले दुःखला दाबुन खदखदून हसणारी मानवी प्रतिभेच जणू ते दृश्यच.

प्रत्येक क्षणाकडे स्थिर होवुन आकलन करणे, गांभिर्य लक्षात घेवून विचारपूर्वक निर्णय घेणे, आवश्यक तितकेच नेमके बोलणे किती पैलू या वक्तीमत्वाचे मला नाही मांडता येणार कधीच नाही,,,, बहुपात्रधारक व्यक्तीमत्व नक्कीच म्हणता येईल. वाट्याला येणारा प्रत्येक किरदार इमानदारीने निभावण्याची कसब आहे. असंख्य चढ उताराच्या परिक्षा देत कधी पास कधी नापास होत आयुष्याचे अध्ययन करत अलमस्त बिनधास्तपणे जगणे म्हणजेच खरच शाही जीवन होय. त्यांच्याकडे बघीतल्यावर उर्जा मिळते पुन्हा काहितरी करण्याची तलब होते. सामाजिक जाणिवेची भावना, एकाग्र मन करत सर्व काही संतुलित स्वरूपाने स्वतःकडून करुन घेणे ही एक मोठी साधनाच होय. साधनेला व्यवहारात उतरविण्याचा जिवंतचांगुलणा अनमोल वाटला.

**- सिनगारे ज्योती लिंबाजी**
**बुलढाणा -७२१८८६८९९०**

# बल्लारपूर मतदारसंघ घरकुल योजनांच्या अंमलबजावणीत संपूर्ण महाराष्ट्रात आदर्श ठरावा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, बल्लारपूर(चंद्रपूर) :** बल्लारपूर मतदारसंघातील प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण व शहरी), रमाई, शबरी, घरकुल योजना तसेच इतर राज्यस्तरीय योजनांच्या माध्यमातून हजारो लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करण्यात आले आहे. या योजनांची अंमलबजावणी अधिक गतिमान, परिणामकारक आणि सुनियोजित व्हावी, तसेच बल्लारपूर मतदारसंघ घरकुल योजनांच्या अंमलबजावणीत संपूर्ण महाराष्ट्रात आदर्श ठरावा, यासाठी प्रभावी व समन्वयाने कार्य करा, अशा सूचना राज्याचे माजी वने, सांस्कृतीक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केल्या. बल्लारपूर मतदारसंघातील घरकुल लाभार्थ्यांच्या विविध समस्यांबाबत शासकीय विश्रामगृह, बल्लारपूर येथे आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला भाजपाचे ज्येष्ठ नेते चंदनसिंह चंदेल, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, शहराध्यक्ष रणंजय सिंग, सतीश कणकम, उपविभागीय अधिकारी अजय चरडे, तहसीलदार (बल्लारपूर) रेणूका कोकाटे, तहसीलदार (मुल) मृदूला मोरे, बल्लारपूरचे न.प. मुख्याधिकारी विशाल वाघ, संदीप दोडे(मुल), निखिल लांडगे (पोंभुर्णा), संवर्ग विकास अधिकारी (चंद्रपूर) संगीता भांगरे, धनंजय साळवे (बल्लारपुर), विवेक बेलालवार (पोंभुर्णा), अरुण चनकणे (मुल), बल्लारपूर वनपरिक्षेत्र अधिकारी राजेंद्र घोरुडे आदींची उपस्थिती होती.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी विविध घरकुल योजनांतर्गत मंजूर झालेल्या हजारो लाभार्थ्यांना भेडसावत असलेल्या निधीचा विलंब, तांत्रिक अडचणी, अपूर्ण बांधकाम व जागेच्या समस्यांसंदर्भात आयोजित आढावा बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना योग्य मार्गदर्शन



करून घरकुलाचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. आ. मुनगंटीवार म्हणाले, मतदारसंघातील घरकुल कोणत्या कारणाने अपूर्ण आहेत याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती घ्यावी. वडिलांच्या नावाने घरकुल मंजूर झाले असले, तरी ते वयस्कर असल्यामुळे आवश्यक कागदपत्रे उपलब्ध होण्यास अडचण निर्माण होते. त्यामुळे मुलाचे जातीचे प्रमाणपत्र व तत्सम कागदपत्रांच्या आधारे घरकुल मंजूरीची प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी. शबरी आवास तसेच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर घरकुल योजनेंबाबत संबंधित संवर्ग विकास अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेण्यात यावी. विशेषतः पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर घरकुल योजनेत लाभार्थी संख्या कमी असूनही मंजुरी संख्या अधिक असल्यामुळे या विषयावर आढावा बैठक आयोजित करण्यात यावी. ज्या लाभार्थ्यांना स्वतःची जागा उपलब्ध नाही, अशा लाभार्थ्यांना ग्राम पंचायतीमार्फत जागा खरेदी करून देण्यात यावी. या खरेदीसाठी संबंधित ग्रामपंचायतीला आवश्यक निधी उपलब्ध करून देता येईल. यासोबतच यशवंतराव मुक्त वसाहत योजनेसंदर्भातही लवकरच बैठक आयोजित करण्यात येईल. घरकुल योजनांच्या अंमलबजावणीत बल्लारपूर महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर राहावा, यादृष्टीने प्रभावी व समन्वयात्मक कार्य करण्याची आवश्यकता असल्याचे आ. सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

## डायरी...

अनटोल्ड ही स्टोरी
अमूकतमूक डायरी
भरून वाहे थिएटर
खुशीत हसे पायरी

टिकाअस्त्र सोडाया
विरोधी टपले सैरी
चटपटीत खात बसे
मिटक्या मारत कैरी

सेन्सॉर येई आडवा
काही दृश्यां कातरी
असल्या अटी मुळे
बिघडू जाई खातरी

काढले दृश्य कोणते
आपण प्रश्न विचारी
लज्जत वृध्दी करता
करतो का रे आचारी

राजकारण हो चालू
भलतीभली शिशारी
पाय मागे ओढायला
सजूनबसल्या सुसरी

स्पेशल शोआयोजित
सिनेम्या देतातउभारी
फुकटचे बुकींगफुल्ल
थेटर मालक आभारी

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**
www.kavyakusum.com

# वेळेचे महत्त्व वेळेवर ओळखा...

मानवी जीवनात इतर काही अत्यावश्यक गोष्टींपेक्षा वेळेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. वेळ आणि मानवी जीवन यांची उत्तम सांगड घातली गेली आहे. वेळेचे महत्त्व आणि वेळेचे गणित मानवी जीवनाला गतिमान करतात. वेळ आणि आपला आळस, वेळ आणि आपल्या वाईट सवयी, वेळ आणि आपले गैरवर्तन यांचा कधीच ताळमेळ लागत नाही. जीवनात यशस्वी होण्यासाठी, यशाचे शिखर सर करण्यासाठी वेळेचे महत्त्व जाणून घेणे काळाची गरज बनली आहे. ज्यांनी वेळेचे महत्त्व वेळेवर जाणून घेतले, विद्यार्थ्यांनी वेळेवर वेळेचे महत्त्व समजून घेतले तर जीवनाचा कायापालट व्हायला वेळ लागत नाही! वेळेशी मैत्री करा, वेळ आयुष्यभर साथ सोडत नाही. वेळेवर आपापली कामे करा, वेळेवर अभ्यास करा यशाचे शिखर नक्की गाठता येते. म्हणून वेळेचे महत्त्व वेळेवर ओळखून जीवनाचा खडतर मार्ग सोपा करता येतो.

केवळ एक आणि एकच मिनिट उशीर झालेल्या प्रवाशाची बस हुकते तेव्हा त्याला वेळेचे महत्त्व विचारा. वेळेवर अभ्यास न करणाऱ्या व परीक्षेत नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांना वेळेचे महत्त्व विचारा. पेरणीला उशीर झाल्यास उत्पन्न घटते हे शेतकऱ्यांना चांगले माहीत असते म्हणून ते वेळेवर पेरणी करायला प्राधान्य देतात. इतर सगळी अतिशय महत्त्वाची कामे सोडून देऊन पेरणीच्या दिवसात सगळ्यांच्या अगोदर शेतकरी शेतात हजर होतो. सगळी जुळवाजुळव करून पेरणीला आरंभ करतो. ठरवल्याप्रमाणे पेरणी विहित मुदतीत पूर्ण झाली की शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचा विलक्षण आनंद पसरतो.

स्पर्धा परीक्षेचा पेपर वेळेत सोडविणारा विद्यार्थी आनंदाने परीक्षा हॉलमधून बाहेर



पडतो.

दिलेली वेळ आणि दिलेला शब्द वेळेवर पाळता आला पाहिजे. उसने पैसे घेणारे लोक ठरलेल्या वेळेला उसने पैसे परत करत नाहीत तेव्हा वेळ गौण ठरते. उपवर मुलामुलींचे वेळेवर लग्न झाले नाहीत तर त्यांच्या आयुष्य खडतर बनते. हे खरे आहे की मानवी जीवनाचे काही टप्पे ठरलेले आहेत. त्या त्या वयात ठरलेल्या गोष्टी पूर्ण केल्या तरच मानवी जीवनाला अर्थ प्राप्त होतो. काही गोष्टी मागे पडत गेल्या की लोक विनाकारण चर्चा करतात आणि नको त्या गोष्टीचा बाऊ करतात. काही लोक वेळेला अजिबात महत्त्व देत नाहीत आणि काही लोक वेळ तंतोतंत पाळतात. लग्नपत्रिकेवर लग्नाची वेळ छापलेली असते. परंतु, लग्न कधीच वेळेवर लागत नाही. कोणत्याही सांस्कृतिक कार्यक्रमाची वेळ निमंत्रण पत्रिकेवर छापलेली असते पण तो कार्यक्रम कधीच वेळेवर सुरू होत नाही. ही एक नवीन कुप्रथा आपण सर्वांनी मिळून सूरु केली आहे.

आजच्या काळात गुणवान लोक वेळ कटाक्षाने पाळतात. कर्तव्यदक्ष नोकरदार व्यक्ती वेळेच्या आधीच, ऑफिसमध्ये पोहचतात. आदर्श शिक्षक कधीच शाळेत उशिरा जात नाहीत. सेवाभाव जपणारे आणि पेशंटची सेवा हीच ईश्वर सेवा ही वृत्ती जोपासणारे डॉक्टर दवाखान्यात कधीच उशिरा जात नाहीत.कमी वेळेत वेगाने धावणारा हुसेन बोल्ट जगातील सर्वात वेगवान धावपटू बनला आहे. क्रिकेटच्या खेळात अगदी मायक्रो सेकंदात स्टंपिंग करून महेंद्रसिंग धोनीने अनेक सामने भारताच्या बाजूने फिरवले आहेत. ज्ञानाचे महामेरू भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर अठरा अठरा तास अभ्यास करायचे. त्यामुळे ते अनेक अवघड परीक्षा सहज व चांगले गुण घेऊन उत्तीर्ण झाले. वेळेवर अध्ययन करणे व ज्ञानाचा साठा वाढविणे हे बाबासाहेबां व्यतिरिक्त अन्य कोणाला आजवर जमले नाही. आणि म्हणून आज ते जागतिक दर्जाचे विचारवंत व ज्ञानी महामानव म्हणून ओळखले जातात.

जीवनात वेळ वाया घालवायचा नसतो. वाया घातलेल्या वेळेचे महत्त्व नंतर कळते, मग पश्चात्ताप होतो. शिक्षणाचा गंध नसलेले पशुपक्षी सुध्दा त्यांची दैनंदिन कामे वेळेवर कळतात. मग आपण तर माणसे आहोत. आपल्याकडे आकलन व ज्ञान ग्रहण करण्याची क्षमता आहे. वेळ किती अमूल्य आहे याचे भान माणूस या नात्याने आपण ठेवलेच पाहिजे. आपले वडिलधारी मंडळी आजही सगळी कामे अगदी वेळेवर करतात. त्यांचा आदर्श इतरांनी घेतला पाहिजे. आणि हो आजच्या सगळ्याच विद्यार्थ्यांनी वेळ अजिबात वाया घालवू नये. मोबाईल हे एक अजब साधन आहे जे अमूल्य वेळ वाया घालवायला भाग पाडते. योग्य त्या कारणांसाठी मोबाईल वापरावा इतरवेळी तो चार हात लांब ठेवावा. शेवटी इतकेच सांगावे वाटते की वेळचे महत्त्व वेळेवर ओळखून वेळेचा सदुपयोग करायला शिका. इतर कोणत्याही गोष्टींपेक्षा वेळचे मूल्य जास्त आहे हे ऐऱ्यागैऱ्यांना कधीच कळत नाही. ही खरी शोकांतिका आहे.

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायलयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मुळा नदीवरील पुलावर कठडे बसवा - सुजित झावरे पाटील
### आमदार खताळ यांना दिले निवेदन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, अहिल्यानगर :** जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील टेकुडवाडी ते संगमनेर तालुक्याला जोडणाऱ्या मुळा नदीच्या पात्रावरील पुलावर संरक्षक कठड्यांचा अभाव असून, त्यामुळे अपघातांचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांची भेट घेऊन सदर पुलावर संरक्षक कठडे बसवण्याचे मागणीचे निवेदन सादर केले. सदर पूल पारनेर व संगमनेर तालुक्याला जोडणारा महत्त्वाचा रस्ता असून दररोज शेकडो वाहाने व नागरिक या मार्गाने प्रवास करतात. मात्र पुलावर कठडे नसल्याने आत्तापर्यंत किरकोळ अपघात घडले असून मोठ्या दुर्घटनांची शक्यता नाकारता येत नाही असे निवेदनात म्हटले आहे. निवेदनातील मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत आमदार अमोल खताळ यांनी तातडीने कठडे बसवण्याचे आश्वासन दिले आहे. यासाठी त्यांनी संबंधित विभागाशी त्वरित संपर्क साधून या कामाला गती देण्याचे निर्देश देणार असल्याचे सुजित झावरे पाटील यांनी सांगितले. हा पूल दोन्ही तालुक्यासाठी वाहतूक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा असल्याने संरक्षक कठडे बसवण्याचा निर्णय सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. स्थानिक नागरिकांनी झावरे पाटील यांच्या पाठपुराव्याचे व आमदार अमोल खताळ यांच्या तत्परतेचे स्वागत केले असून काम लवकर पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## मिरा भाईंदरमध्ये मोठा राडा, मनसेच्या कार्यकर्त्यांची धरपकड



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०८, मिरा-भाईंदर :** मिरा-भाईंदर येथे अमराठी व्यापाऱ्यांच्या मोर्चाला उत्तर म्हणून मनसेने मराठी भाषेच्या अस्मितेसाठी मोर्चाचे आयोजन केले गेले होते. मात्र या मोर्चाआधी मध्यरात्री मनसेच्या मुख्य नेत्यांना नोटीस पाठवत अटक करण्यात आली आहे. मात्र तरीसुद्धा मोर्चाच्या ठिकाणी मनसे नेत्यांसह सर्वसामान्यांना अटक करण्यात येते आहे. पोलिसांनी आंदोलनस्थळावरून जे कोणी येईल त्यांना गाड्यांमधून भरून घेऊन जात आहेत. मराठी माणसांच्या मोर्चाला का परवानगी दिली नाही असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.


राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर कोणाचा दबाव आहे का? असा सवाल ठाकरे सेनेचे नेते संजय राऊत यांनी केलाय. मोर्चाच्या ठिकाणी सर्वसामान्यांनाही ताब्यात घेत आहेत. कोणालाही तिथे थांबू दिलं जात नाहीय. ज्यांना ताब्यात घेतलं जात आहेत त्या महिला आपण कार्यकर्ते नाहीत तरीसुद्धा का पकडत आहात? असं पोलिसांना ते बोलत आहेत. मात्र पोलीस काही एक न एकता जो दिसेल त्याला ताब्यात घेत आहेत.

पोलिसांच्या भूमिकेबद्दल संशय निर्माण होतो. व्यापाऱ्यांना परवानगी दिली नव्हती तरी त्यांनी मोर्चा काढला. MNS Mira Bhayandar Morcha मराठी बांधव काढत असतील तर त्यांना शांततेच्या मार्गाने काढू द्या. रात्री-बेरात्री लोकांना अटक करायची हे चुकीचं आहे. शहरातील वातावरण खराब करत असतील तर कोणत्या राजकीय पक्षाला किंवा नेत्याला पोलीस या कारवाया करत आहेत का असा प्रश्न निर्माण होतो. मी मंत्री, आमदार नंतर आधी मराठी आहे, हे पोलिसांनी केलं ते निंदनीय असल्याची प्रतिक्रिया परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितलं.

**पोलिसांनी परवानगी का नाकारली?**

दरम्यान, मोर्चाला परवानगी नाकारण्यात आलेली होती. त्यामुळे नाकारण्यात आलेला असताना मोर्चा काढण्याचा प्रयत्न केला. त्या अनुषंगाने कायदेशीर कारवाई करत केली. मोर्चाला परवानगी नाकारण्याचं कारण हे आहे की, या मोर्चासाठी जो अर्ज आला होता त्यामध्ये या ठिकाणावरून मोर्चा काढण्याचा अट्टहास होता. या ठिकाणी एक घटना इथे घडली त्याच ठिकाणी लोकांनी एकत्र येऊन मोर्चा काढणं हे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो म्हणून परवानगी दिली नसल्याचं पोलिसांनी सांगितलं.

## सोलापूर दूध संघ गैरव्यवहार प्रकरणी विधानसभेत
### आ.अभिजीत पाटील यांनी उठवला आवाज



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०८, पंढरपूर :** सोलापूर जिल्हा दूध उत्पादक संघामध्ये झालेल्या आर्थिक अपहार प्रकरणावर आज विधानसभेत आमदार अभिजीत पाटील यांनी शासनाची स्पष्ट भूमिका आणि जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करत ठोस प्रश्न उपस्थित केला.

राज्य दूध महासंघात अपहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर अद्याप कारवाई का नाही? या प्रश्नाला जोडून आमदार पाटील यांनी सांगितले की, सोलापूर जिल्हा दूध संघातसुद्धा अशाच स्वरूपाचा प्रकार घडला होता. त्यावर ८३ आणि ८८ अंतर्गत चौकशीही झाली, संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले. परंतु, मंत्रालयात पोहोचल्यानंतर एका वरिष्ठ अधिकाऱ्याने ही चौकशी रद्द करत संचालक मंडळ पुन्हा पूर्ववत केले.

हा सर्व प्रकार म्हणजे स्पष्टपणे भ्रष्टाचार सिद्ध झाल्यावरही शासन त्यावर कठोर पावले न उचलता दोषींना अभय देत असल्याचा स्पष्ट संदेश समाजात जात आहे, हे अत्यंत दुर्दैवी आहे, असे आमदार पाटील यांनी ठामपणे विधानसभेत सांगितले.

दोषींना निलंबित का करण्यात आले नाही? मंत्रालयातूनच चौकशी का रद्द करण्यात आली? भ्रष्टाचार सिद्ध झाल्यानंतरही संचालक मंडळ पूर्ववत का केले? अशा प्रकारांना अभय देण्याचा शासनाचा हेतू काय? दूध उत्पादक शेतकरी आणि जनतेच्या पैशांचा अपहार करणाऱ्यांना अभय देणं म्हणजे अन्यायाला पाठबळ देणं होय. याविरोधात आम्ही आवाज उठवत राहू, आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत ठोस भूमिका घेण्यात येईल, असा इशाराही आमदार अभिजीत पाटील यांनी यावेळी दिला.

# 'अक्षराज'च्या बातमीचा इम्पॅक्ट!

## शेवटी प्रशासनाने घेतली दखल; दिव्यातील ररस्त्यांचे खड्डे बुजवायला सुरुवात




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०८, दिवा (ठाणे) :** शेवटी प्रशासनाने अक्षराजच्या बातमीची घेतली दखल. ठाणे महानगरपालिकेकडून सोमवारपासून खड्डे बुजवाला सुरुवात झाली आहे. दिवा सर्कल पासून शिळफाट्या जंक्शन नाक्यापर्यंत मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते.

विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, गरोदर महिला, वाहन चालकाला चिखलातूनच मार्ग काढून जावे लागत होते. दिव्यातील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. रोज २५ ते ३० हजार प्रवासी या मार्गातून प्रवास करतात. अक्षराज वृत्तपत्रात बातमी छापून आली. त्यानंतर प्रशासनाला जाग आली. आजचा दुसरा दिवस खड्डे बुजवण्याचा काम चालू आहे. दिवा प्रभाग समितीचे सार्वजनिक बांधकाम अभियंता दीपक माने यांनी दखल घेतली आहे.

या मार्गावरील संपूर्ण खड्डे बुजवण्यात येतील. नागरिकांना दिलासा दिला जाईल असे त्यांनी म्हटले आहे. खड्डे बुजवण्याचे काम चालू झाल्यामुळे. नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

दिव्याच्या नागरिकांनी अक्षराज मीडियाचे आभार मानले आहे. तसेच ठाणे आयुक्त यांचे सुद्धा आभार मानले आहेत. आयुक्तांनी दखल घ्यावी या बातमीमध्ये उल्लेख करण्यात आला होता. दिवेकरांच्या समस्येची आयुक्तांनी दखल घेतल्याबद्दल दिवेकरांनी समाधान व्यक्त केला आहे.

## २.१२ कोटींचा मेफेड्रॉन परदेशी नागरिकाकडून जप्त; मानपाडा पोलिसांची मोठी कारवाई



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०८, डोंबिवली (ठाणे) :** काही दिवसांपूर्वी मानपाडा पोलिसांनी अंमली पदार्थांची मोठी कारवाई करत सव्वा दोन कोटी रुपये किमतीचा मेफेड्रॉन (एम.डी) जप्त केला होता. या प्रकरणात तपास सुरू असताना मानपाडा पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार, ७ जुलै रोजी नवी मुंबईतील निळजे गावाजवळील तलाव परिसरात छापा टाकण्यात आला. या छाप्यात एक परदेशी नागरिक अटक करण्यात आला असून त्याच्याकडून एकूण १.५१ किलो मेफेड्रॉन, अंदाजे २.१२ कोटी रुपये किमतीचा अमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे.

अटक करण्यात आलेला आरोपी आयव्हरी कोस्ट (Ivory Coast) येथील रहिवासी आहे. त्याच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर नं. ७८७/२०२५ अन्वये गुंगीकारक औषधे आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ मधील कलम ८(क), २१(क), २२(क) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या आधी २७ जून रोजीही मानपाडा पोलिसांनी गु.र.नं. ७३१/२०२५ अन्वये मेफेड्रॉनसह एक मोठी कारवाई केली होती. त्यावेळी मुख्य आरोपी फरहान उर्फ मोहम्मद राहीब सलीम शेख याच्याकडून बेंगळुरू येथून चोरीची गाडी आणि एम.डी जप्त करण्यात आले होते.

या दोन्ही कारवाया एकाच प्रकरणाशी संबंधित असून, आरोपींना पकडण्यासाठी नवी मुंबई परिसरात तपास सुरू होता. त्याच दरम्यान ही दुसरी मोठी कारवाई करण्यात आली.

ही यशस्वी कारवाई ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, सह आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण, अपर आयुक्त (पूर्व विभाग) संजय जाधव, उप आयुक्त (परिमंडळ ३, कल्याण) अतुल शेंडे, आणि सहाय्यक आयुक्त (डोंबिवली विभाग) सुहास हेमाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईत वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिपान शिंदे, पोलीस निरीक्षक (प्रशासन) दत्तात्रय गुंड, सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर चव्हाण, अजय कुंभार, तसेच पोलीस हवालदार पाटील (६९०३), माळी (६६७२), राठोड (६९२१), आडे (८४११), गरूड (७७७९), झांझुणे (३८१९), चौधर (८२१५) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. मानपाडा पोलिसांची ही सलग दुसरी मोठी यशस्वी कारवाई असून, आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ साखळीवर मोठा आघात मानला जात आहे. पुढील तपास अधिक गतीने सुरू आहे.

## बिबट - मानव संघर्षावर उपाययोजना करा; खासदार लंकेच्या पाठपुराव्याला यश
### भूपेंद्र यादव यांचे राज्य सरकारला ठोस निर्देश



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०८, पारनेर (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यभर वाढत असलेला बिबट्याचा प्रादुर्भाव व बिबट - मानव यांच्यातील वाढता संघर्ष लक्षात घेता केंद्र सरकारने तातडीने उपयोजना कराव्यात. तसेच बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या गंभीर विषयाची वेळोवेळी संसदेत तसेच केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणारे खासदार नीलेश लंके यांना मोठे यश मिळाले आहे.

केंद्रीय पर्यावरण, वनमंत्री भूपेंद्र यादव यांनी महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाला तातडीने अंमलबजावणी निर्देश दिले आहेत.

यासंदर्भात पाठपुरावा करताना खा.लंके यांनी मंत्री भूपेंद्र यादव यांना निवेदन सादर केले होते. त्यात नगर जिल्ह्यासह राज्यात बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे नागरिकांचा मृत्यू झाला आहे. अनेक शेतकरी, महिला, लहान मुले या हल्ल्यांना बळी पडले आहेत.

ग्रामीण भागात भीतीचे सावट पसरले आहे. या पार्श्वभूमीवर संवेदनशील भागांत त्वरित संरक्षण यंत्रणा उभारणे, पथके तैनात करणे आणि पीडीत कुटुंबांना तात्काळ मदत मिळावी, अशा मागण्या खा. लंके यांनी केल्या होत्या.

संवेदशील भागांची ओळख पटवावी. बिबट्याच्या सतत वावरामुळे उच्च धोका निर्माण झालेल्या गावांची यादी तातडीने तयार करावी.

त्वरित प्रतिसाद पथके तैनात करावीत. प्रशिक्षित वन कर्मचारी व पशुवैद्यकीय अधिकार्यांचा समावेश असलेली प्रतिसाद पथके तयार करून बिबटया हल्ल्यांना प्रतिसाद देणे अनिवार्य करावे. केंद्रीय मानक कार्यपद्धतीचे पालन करावे आदी निर्देश केंद्रीय मंत्र्यांनी दिले आहेत.

**दिरंगाई सहन करणार नाही**

खासदार लंके यांनी केंद्रीय मंत्रयांच्या या ठोस हस्तक्षेपाचे स्वागत करत राज्य शासनाने सूचनांची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी केली आहे. ग्रामीण जनतेच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर असून यामध्ये कोणतीही दिरंगाई सहन कली जाणार नाही. वन विभागाने स्थानिक पातळीवर जागरूकता वाढवून अधिक सगज आणि जबाबदार भूमिका घ्यावी, अशी मागणी खासदार निलेश लंके यांनी केली.

## मराठी हिंदी भाषा वादात एकनाथ शिंदेंचा कल्यामध्ये मास्टरस्ट्रोक...



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०८, कल्याण (ठाणे) :** राज्यभरातील हिंदी-मराठी भाषिक वादाच्या पार्श्वभूमीवर, शिवसेना (शिंदे गट) यांनी उत्तर भारतीय पदाधिकाऱ्यांची मोठी भरती केली आहे. ही भरती कल्याणमध्ये झाली असून,यामुळे विशेषतः काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. शिंदे गटाचे हे पाऊल मतदारसंख्या वाढवण्याच्या आणि राजकीय बळ वाढवण्याच्या दृष्टीने पाहिले जात आहे.स्थानिक निवडणुकांमध्ये याचा मोठा प्रभाव पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राज्यात एकीकडे हिंदी विरुद्ध मराठी हा भाषिक वाद पेटला आहे. त्यातच काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जय गुजरात अशी घोषणा केल्याने राजकीय वातावरण तापलं होतं. एकीकडे मराठी अस्मितेचा वाद पेटलेला असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना शिंदे गटाने मात्र शांतपणे आपली रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. कल्याणमध्ये शिंदे गटाने काँग्रेसला खिंडार पाडत शेकडो उत्तर भारतीय पदाधिकाऱ्यांची जंबो भरती केली आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ मोठी उडाली आहे.

सध्या महाराष्ट्रात मराठी विरुद्ध हिंदी भाषेवरून राजकारण तापलेले असताना शिंदे गटाने हिंदी भाषिकांचे मत मिळवण्यासाठी आणि पक्ष मजबूत करण्यासाठी हा मास्टरस्ट्रोक खेळला असल्याचे बोलले जात आहे. कल्याण पश्चिमचे आमदार विश्वनाथ भोईर यांच्या उपस्थितीत शहाड या ठिकाणी शेकडो उत्तर भारतीय पदाधिकाऱ्यांचा भव्य पक्षप्रवेश सोहळा पार पडला. या पक्षप्रवेशाने काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. तसेच यामुळे कल्याणच्या राजकारणात नवे समीकरण तयार होण्याची चिन्हे आहेत.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जय भारत, जय महाराष्ट्र, जय गुजरात यांनी दिलेल्या घोषणेनंतर राज्यात राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. विशेषतः मराठी अस्मितेच्या मुद्द्यावरून ठाकरे गट आणि मनसेने आक्रमक भूमिका घेतली होती. त्यातच नुकत्याच झालेल्या वरळी डोम येथील राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या संयुक्त मेळाव्यातही मराठी भाषेच्या अवमानावरून एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार टीका करण्यात आली.

या टीकेला आणि भाषिक राजकारणाला बगल देत शिंदे गट मात्र आपली राजकीय गणितं नव्याने आखताना दिसत आहे. आमदार विश्वनाथ भोईर यांनी शहाड परिसरात काँग्रेसमधील उत्तर भारतीय समाजातील अनेक प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना शिवसेना शिंदे गटात सहभागी करुन घेतले आहे. ही उत्तर भारतीय जंबो भरती केवळ स्थानिक पातळीवर नव्हे, तर राज्यभरात राजकीय दृष्टिकोनातून चर्चेचा विषय बनली आहे. आगामी स्थानिक निवडणुकांमध्ये उत्तर भारतीय मतदारांच्या पाठिंब्यामुळे शिंदे गटाकडून 'हिंदी पट्टा' अधिक मजबूत करण्याची तयारी सुरु आहे, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. शिंदे गटाकडून भाषेच्या रणधुमाळीतही आपल्या मतांची बेरीज वाढवण्यावर लक्ष केंद्रित केल्याचे स्पष्ट दिसत आहे

# वारकरी भाविकांची आरोग्य शिबिरामध्ये तुफान गर्दी

## आषाढी वारीनिमित्त पंढरीत दाखल भाविकांची आरोग्य प्रशासनाकडून घेतली जाते काळजी

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०८, पंढरपूर :** विठुरायाच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह देश परदेशातून शेकडो पायी चालत आलेल्या भाविक-भक्तांसाठी महारोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून शेकडो मैलाचे अंतर पायी चालून विठुरायाच्या दर्शनासाठी आतुर झालेल्या भाविक भक्तांसाठी या महाआरोग्य शिबिराचे आयोजन मुख्यमंत्री सहायता निधी व सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्या वतीने करण्यात येत असून यामध्ये विशेषता भाविक, भक्तांच्या आरोग्याची काळजी घेणे हे मुख्य उद्दिष्ट असून यामध्ये मोफत तपासणी व उपचार आरोग्य केंद्रा मार्फत आरोग्य सेवा १०२ व १०८ रुग्णवाहिका स्त्री रोग तज्ञा मार्फत सेवा, पाणी नमुने तपासणी,



पाण्याच्या स्त्रोताची ओटी टेस्ट करणे, हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानाच्या माध्यमातून मोफत सेवा, आपत्कालीन सेवा, वारी मार्गावरील हॉटेल्स व निवासस्थानाच्या स्वयंपाक स्थळाची पाहणी, धूर फवारणी, सुसज्ज आरोग्य पदके, चित्ररथामार्फत आरोग्य विषयी जनजागृती, पालखी मुक्कामाच्या ठिकाणी अति दक्षता केंद्र, हिरकणी कक्ष, औषधी किडचे वाटप, जैव कचरा विल्हेवाट, आरोग्य शिक्षण संवाद आरोग्य ज्ञानेश्वरी उपक्रम, भाविकांची डोळे तपासणी करून मोफत चष्म्याचे ही वाटप करण्यात येते.

अशा विविध उपक्रमांनी भाविकांच्या आरोग्याची काळजी घेण्यात येत असते. महाराष्ट्र शासनातर्फे राबवण्यात येणाऱ्या या आरोग्य शिबिराचे सर्व वारकरी भक्ता म्हणून कौतुक होत असून पांडुरंगाचे दर्शन झाल्याचे समाधान व दुसऱ्या बाजूला महाशिबिरामुळे मिळणारा दिलासा यामुळे भाविक सुखावल्याचे दिसून येत आहे.

# ढोकेश्वर विद्यालयास परिविक्षाधीन अधिकाऱ्यांची भेट

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) :** यशदा संस्थेमार्फत आयोजित ५ दिवसांच्या निवासी अभ्यास दौऱ्याअंतर्गत परिविक्षाधीन अधिकाऱ्यांनी दिनांक ०७ जुलै २०२५ रोजी टाकळी ढोकेश्वर येथिल श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळी ढोकेश्वर विद्यालयाला भेट दिली.

या भेटी दरम्यान परिविक्षाधीन अधिकारी शीतल घोलप (उपजिल्हाधिकारी), रुपा मोहितकर (बाल विकास प्रकल्प अधिकारी), सागर वाघमारे (तहसिलदार)गौरव बंग (सहाय्यक राज्य कर आयुक्त),अनिल काळे (सहाय्यक राज्य कर आयुक्त), प्रेरक उजगरे (शिक्षणाधिकारी) हे अधिकारी उपस्थित होते. सर्व अधिकारी सकाळी विद्यालयाच्या प्रार्थना सभेस उपस्थित राहिले त्यांनी विद्यार्थ्यांनी संवाद साधून यू.पी.एस.सी., एम.पी.एस.सी. आणि इतर परीक्षेच्या संदर्भात मार्गदर्शन केले.

यानंतर विद्यालयाची प्रार्थना सत्र, शालेय परिसर, विज्ञान विभागाच्या लॅब, ग्रंथालय शासकीय वस्तीगृह, पोषण आहार, स्पर्धा परीक्षा व दैनंदिन कामकाजाची माहिती घेतली व समाधान व्यक्त केले. विद्यालयाच्या विज्ञान विभागामार्फत सुरू केलेल्या सीईटी वर्गातील विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक करिअरच्या दृष्टीने मार्गदर्शन केले. विद्यालयाच्या वतीने सर्व परिविक्षाधिन अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक



मनीषा गाडगे, शास्त्र समन्वयक अशोक गांगड, कला समन्वयक विजय सोबले, ढोकेश्वर वस्तीगृह अधीक्षक बाळासाहेब रोकडे विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# रस्त्यावरील खड्डे ८ दिवसांत भरले नाहीत तर तीव्र आंदोलन करणार - नितीन पिसाळ

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०८, पाटण (सातारा) :** कराड-चिपळूण महामार्ग व पाटण शहरात अंतर्गत रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. याकडे सार्वजनिक रस्ते विभाग व पाटण नगरपंचायतीचे सर्रासपणे दुर्लक्ष झाल्याने याविरोधात सामाजिक कार्यकर्ते नितीन पिसाळ यांच्या नेतृत्वाखाली दिनांक ०७ जुलै २०२५ रोजी रस्त्यावर आंदोलन करण्यात आले. यावेळी रस्त्याचा ठेका घेतलेल्या ऑलग्रेस कंपनीचे अधिकारी यांनी आंदोलनस्थळी येऊन ८ दिवसात खड्डे भरण्याबाबत लेखी पत्र दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. दरम्यान ८ दिवसात रस्त्यावरील खड्डे भरले नाहीत तर पुन्हा तीव्र आंदोलन



करू, असा इशारा ही नितीन पिसाळ यांनी अधिकाऱ्यांना दिला आहे.

कराड-चिपळूण रस्त्यावरील केरापुलापासून ते रामापूरपर्यंत आणि पाटण शहरातील अंतर्गत रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडल्याने रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. या रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे अनेक लहान-मोठे अपघात होऊन अनेक जण गंभीर जखमी देखील झाले आहेत. खड्ड्यातून वाट काढत वाहन चालकांना ये-जा करावी लागत आहे. सर्वसामान्य लोकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागतो आहे. याकडे पाटण नगरपंचायत व रस्ते विभागाचे दुर्लक्ष झाले आहे.

याविरोधात सामाजिक कार्यकर्ते नितीन पिसाळ यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी नागरिकांनी रामपूर येथे आंदोलन केले. आंदोलन प्रसंगी पाटण ते कोयना रस्त्याच्या कामाचा ठेका घेतलेल्या ऑलग्रेस कंपनीचे अधिकारी अरविंद गुप्ता यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन आठ दिवसात रस्त्यावरील खड्डे भरू असे लेखी पत्र सादर केले. लेखी आश्वासनानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. आठ दिवस रस्त्यावरील खड्डे भरले नाहीत तर ८ दिवसानंतर तीव्र आंदोलन करू असा इशारा ही नितीन पिसाळ यांनी बोलताना दिला आहे. आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते नितीन पिसाळ, समीर सय्यद, अनिल बोधे, सागर माने, संजय कुंभार, मारुतीराव मोरे, सचिन साळुंखे, सूरज कुंभार, शोहेब शेख, महेश झगडे, विजय महादर आदींसह ग्रामस्थ सहभागी झाले होते.

# मनसेच्या आमरण उपोषणाचे राष्ट्रीय महामार्ग विभागाला नाही सोयसुतक

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, पाटण (सातारा) :** कराड चिपळूण राष्ट्रीय महामार्गची झालेली दुरावस्था आणि लेखी आश्वासन देऊन केलेली टोलवाटोलवी याविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पाटण तालुकाध्यक्ष गोरख नारकर हे प्रांतकार्यालय पाटण, या ठिकाणी आमरण उपोषणास बसलेले असून उपोषणाचा दुसरा दिवस झाला तरी देखील राष्ट्रीय महामार्ग विभागास काही सोयसुतक नाही असं दिसून येते. वारंवार पत्रव्यवहार, आंदोलन, उपोषणे करुन देखील राष्ट्रीय महामार्ग व संबंधित प्रशासान कंपनीला पाठीशी घालत आहे.

कराड चिपळूण रस्त्याच्या कामाबाबत अनेक वेळा तक्रारी केल्या किंबहुना वारंवार बैठका देखील झाल्या परंतु राष्ट्रीय महामार्ग विभाग याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. एल अँड टी कंपनी वरती काही कारवाई करण्यात आली नाही. याउलट



### उपोषणाचा दुसरा दिवस, अधिकारी वर्गाची टोलवाटोलवी

चोर तो चोर वर शिरजोर याप्रसंगी कंपनीने हात वरती केले. पाटण कोयना रस्त्यावर चाललेला कारभार पाहता कोणालाही न जुमानणारा ठेकेदार आणि त्याला पाठीशी घालणारे प्रशासन यामुळे लोकांचे किती हाल झाले हे उभ्या महाराष्ट्राने पाहिले आहे.

उपोषण दरम्यान केलेल्या मागण्यांची पूर्तता झाल्याशिवाय आंदोलन स्थगित करणार नाही.

उपोषण ठिकाणी येऊन गोड गोड बोलून आम्ही भाळणार नाही. राष्ट्रीय महामार्ग चे अधिकारी एखाद्या करमणूकीच्या कार्यक्रमाला गेल्यासारखे आंदोलन पाहायला येतात. यांना आंदोलनाचे गांभीर्य नाही. राष्ट्रीय महामार्ग विभागाने हात झटकून मोकळे व्हायचे नाही तर संबंधित कंपनी व ठेकेदार यांच्या विरोधात कारवाई करायची. तरचं मनसेचे आंदोलन स्थगित होईल.

अन्यथा आंदोलनाची तीव्रता वाढवणार आणि मनसे स्टाईल दणका नक्की देणार असा इशारा गोरख नारकर व मनसे पदाधिकारी यांनी दिला आहे. आमरण उपोषणाच्या दुसर्या दिवशी अविनाश कवठेकर पोलीस निरीक्षक पाटण, आरोग्य विभाग पाटण यांनी भेट दिली. दरम्यान दयानंद नलावडे कोयना विभाग प्रमुख, राहूल संकपाळ तालुकाउपाध्यक्ष, विक्रमबाबा पाटणकर भाजप समन्वयक, अक्षय देसाई सामाजिक कार्यकर्ते, संपत देसाई, बापू टोळे, नगरसेवक राजकीय, संजय पवार सरपंच, शुभम उबाळे प्रहार तालुकाध्यक्ष, बळीराम गायकवाड, चंद्रकांत देसाई सामाजिक स्तरावरील नागरिकांनी भेटी दिल्या.

# पाडळी गावात पशु आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०७, खंडाळा (सातारा) :** श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालय, फलटणच्या सातव्या सत्रातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव कार्यक्रम (ठक्थए) अंतर्गत पाडळी गावात प्राण्यांचे आरोग्य तपासणी शिबीर आयोजित केले होते. या शिबिराचे मार्गदर्शन डॉ.विशाल कचरे (पशुवैद्यकीय अधिकारी) यांनी केले. शिबिरात गावातील शेतकऱ्यांच्या गुराढोरांची तपासणी करण्यात आली तसेच लसीकरण, कृमी नाशक औषधोपचार व पोषणविषयक सल्ला देण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना पशुधन आरोग्य व्यवस्थापनाविषयी माहिती दिली. गावकऱ्यांनी या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला. डॉ.



कचरे यांनी प्राण्यांच्या विविध आजारांविषयी माहिती देत रोग प्रतिबंधक उपायांवर मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कार्याचा अनुभव मिळाला तसेच गावकऱ्यांना ही उपयुक्त माहिती व सेवा मिळाल्याने दोन्ही पक्षांना लाभ झाला. या उपक्रमासाठी श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. निंबाळकर, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.यु.डी.चव्हाण, कार्यक्रम अधिकारी डॉ.जे.व्ही.लेंभे, प्रा.डॉ.ए.के. अभंगराव व कार्यक्रम समन्वयक प्रा.ए.डी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

# थोडक्यात

## लक्ष्यवेधी बेमुद्दत आंदोलन

**अक्षराज : विनोद गिरी**



**दि.०८, दिवा (ठाणे) :** मराठी बाणा, हिंदी चा कणा माणसात असलेली माणुसकी संपली का? प्रत्येकाने स्त्री पासूनच जन्म घेतला आहे. स्त्री ही कोणाची आई, कोणाची बहीण, कोणाची पत्नी, कोणाचे सर्वस्व असते. तीच स्त्री तुमचे जीव वाचावे म्हणून गेली ८ दिवस झाले, रस्त्यावर बसून लढते आहे. काय मागणे आहे. फक्त दिवा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस लोकल चालू व्हावी आणि अपघातातून जीव वाचावेत. यावर सर्वजण गप्प का आहेत? कोणताही पक्ष राजकारणी, सामाजिक संघटना गप्प का? अरे तुम्ही पण एका स्त्री पासूनच जन्म घेतला आहे. कुठे गेला स्त्री विषयी असलेला आदर, मान सन्मान कुठे गेला मराठी बाणा, कुठे गेले तुमचे जाती विषयी, धर्मा विषयी असलेले प्रेम. शासकीय ऑफिस मध्ये ६ नंतर महिलांना थांबवत नाहीत. पोलिस स्टेशन मध्ये बोलवत नाहीत. इथे तर दिवस रात्र ८ दिवस झाले. एक महिला जनतेसाठी, जनतेचे जीव वाचवण्यासाठी लढत आहे. पोटच्या गोळ्याला टायफड झाला, तरी देखील त्याची परिवाराची काळजी नकरता ती तुमचे जीव वाचावे तुमचा प्रवास सुखाचा होण्यासाठी लढत आहे. तुम्ही फक्त बघ्याची भूमिका घेत आहात. उठा दिवा वासियांनो उठा ही लढाई आहे. तुमच्यासाठी कोणीही राजकीय पक्ष, कोणी येणार नाही. तुमचा लढा तुम्हालाच लढावा लागेल. तुमच्या ही घरात स्त्री आहे. तुम्ही ही एका महिले पासूनच जन्म घेतला आहे. आज जर ही महिला हरली तर ती हार तुमची असेल, संपूर्ण महिलांची असेल माणुसकीची हार असेल. गेलेली वेळ वापस येणार नाही. तुमच्यासाठी कोणीही लढणार नाही. दिवा स्टेशन बाहेर एक्सलेटर समोर पाठिंबा देण्यासाठी या...

## १०० विद्यार्थ्यांचा एकलव्य गौरव पुरस्काराने सन्मान




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, ठाणे :** दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सुमारे १०० एकलव्य विद्यार्थ्यांना एकलव्य गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मराठी ग्रंथ संग्रहालय, स्टेशन रोड, तहसीलदार कचेरी जवळ, ठाणे पश्चिम येथे नुकताच एकलव्य गौरव पुरस्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गेली ३३ वर्ष शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी करणारे गणितज्ञ उत्तम फलके यांची उपस्थिती दिसून आली. तसेच यावेळी प्रतिकूल परिस्थितीत मेहनत, जिद्द आणि चिकाटीने दहावीच्या परीक्षेत यशस्वी झालेल्या अशा विद्यार्थ्यांचा सत्कार हा शिक्षक उत्तम फलके यांच्या हस्ते एकलव्य गौरव पुरस्कार प्रदान करून करण्यात आला आहे.

## लासलगाव शहराकरीता स्वतंत्र पाणीपुरवठा योजना मंजूर करावी - सुवर्णा जगताप




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०८, विंचूर (नाशिक) :** नांदूर मधमेश्वर धरणातून लासलगाव सह परिसरातील सोळा गावांना पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन वारंवार फूटत असल्याने ऐन पावसाळ्यात ही लासलगाव वासियांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे लासलगाव शहरासाठी स्वतंत्र जलपुरवठा योजना असावी अशी मागणी बाजार समितीच्या संचालक सुवर्णा जगताप यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे केली आहे. कांद्याचे राष्ट्रीय व्यापार केंद्र असलेल्या लासलगाव शहरात सध्या नागरिकांचा पाण्यासाठी संघर्ष सुरू आहे. झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर लासलगावकरांनी आता जलपुरवठा योजनेची मागणी उचलून धरली आहे. या मागणीस सुवर्णा जगताप यांनी थेट मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे पाण्याच्या प्रश्नी पाठपुरावा केला आहे.

खडक माळेगाव धरणातून स्वतंत्र जलवाहिनी करावी. सोळा गाव पाणी योजना अजून पूर्णत्वास गेलेली नाही. त्यामुळे लासलगाव पासून अवघ्या १० किलोमीटर अंतरावर असलेल्या खडक माळेगाव धरणातून स्वतंत्र जलवाहिनी टाकावी जेणेकरून शहराचा पाण्याचा प्रश्न कायमचा दूर होऊ शकेल. अशी मागणी भुजबळांना पाठवलेल्या पत्रात करण्यात आली आहे.

**- सुवर्णा जगताप**
**(संचालिका- कृ.उ.बा.समिती लासलगाव,**
**सदस्या- ग्रामपालिका लासलगाव)**